# अनुभव देणारा अभ्यासक्रम

प्रा. रामजोशी यांच्या अध्यक्षतेखाली, महाराष्ट्र सरकारने नियुक्त केलेल्या 'राज्यस्तरीय बालशिक्षण समिती' च्या अहवालात सुचविलेल्या निकषांवर आधारित असा, बालसेविकांच्या प्रशिक्षणासाठीचा अभ्यासक्रम, महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेने, सुमारे दहा वर्षांपूर्वी तयार केला. तो एक - दोन ठिकाणी अमलात आणून, त्याच्या व्यावहारिक अनुभवांच्या आधारावर, त्यात काही सुधारणा करून, त्याची निश्चिती केली. मात्र प्रत्यक्ष बालवाडीत नेमके काय काय करावे, कसेकसे करावे याविषयी शिक्षणक्रम मात्र तयार केला नव्हता. या क्षेत्रातील मान्यवरांनी घालून दिलेल्या परंपरेनेच प्रत्यक्ष वर्गकाम अनेक ठिकाणी चालत असे. रामजोशी समितीच्या अहवालात दिलेल्या ढाच्याप्रमाणे त्यांमध्ये यथावकाश काही बदल मात्र केले गेले; परंतु या बदलांचा काही मोजक्या बालवाडयांमधून अवलंब केला गेल . सार्वत्रिकरित्या त्याचा वापर झाला नाही.

अलीकडे बालशिक्षणशास्त्रातच काही नवकल्पनांचा उदय झाला आहे. बालमानसशास्त्र वेगवेगळया संशोधनांच्या आधारे विकसित होत गेले. यातच मज्जाशास्त्रांमधील संशोधनांनी बालकाकडे पाहण्याची एक वेगळीच दृष्टी आपल्याला प्रदान केली आहे . तिच्या आधारावर जगात अनेक प्रगत राष्ट्रांमधून संपूर्ण शिक्षणरचनाच वेगाने बदलू लागली आहे. 'मेंदूआधारित  शिक्षणा'ची संकल्पना आता रूढ होऊ लागली आहे. नव्याने निर्माण झालेली मज्जामानसशास्त्राची ज्ञानशाखा बालकांच्या संदर्भात काही नवी माहिती घेऊन पुढे आलेली आहे. त्या आधारावर बालशिक्षणाची नव्याने मांडणी करण्याची गरज आता भासत आहे. ही गरज अंशतः तरी भागविण्याचा प्रयत्न बालवाडीतील शिक्षणाबाबतचा हा, नवा शिक्षणक्रम पूर्ण करील अशी आशा आहे. बालवाडी शिक्षण संस्थांनी आणि शिक्षिकांनी हा शिक्षणक्रम उपयोगात आणून मुलांना अधिक रास्त अनुभव द्यावेत, असे सुचवावेसे वाटते.

बालवाडीत मुलांचे शिक्षण होणे अपेक्षित असते, परंतु, त्यांनी काही 'अभ्यास' करावा अशी कल्पना नसते. त्यामुळे, या पुस्तिकेमध्ये 'अभ्यासक्रम' असा शब्द टाळून त्याऐवजी 'शिक्षणक्रम' असा शब्द वापरला आहे. असेच आणखी एक -दोन शाब्दिक बदल केले आहेत. यापूर्वी बालवाडीत भाषा, गणित वगैरे 'विषय' असत, जसे ते प्राथमिक माध्यमिक शाळांमधून आहेत. परंतु बालशिक्षण आणि त्यानंतरचे प्राथमिक -माध्यमिक वगैरेंचे शिक्षण यांत एक मूलभूत फरक आहे. केवळ, अनौपचारिक शिक्षण आणि औपचारिक शिक्षण असा हा फरक नाही. मुळात, बालशाळेत मुलांना शिकवायचे' नसते, त्यामुळे शिकवायचे ते ‘विषय' तिथे नसतात. तर बालवाडीत मुलांना त्यांच्या विकासाच्या गरजांनुरूप, काही शैक्षणिक अनुभव द्यायचे असतात. 'अनुभव देते ती शाळा' अशी बालशिक्षणाच्या क्षेत्रातील 'शाळे' ची व्याख्या केली जाते. त्यामुळे ‘विषय' या शब्दाचे उच्चाटन

करून तेथे 'अनुभव' या शब्दाची प्रतिष्ठापना करणे जरूरीचे आहे. या कारणासाठी, तसेच बालशिक्षणातील शिक्षणाचे नेमके स्वरूप दृष्टीसमोर यावे, यासाठी या पुस्तिकेत प्रथमतःच 'भाषिक अनुभव', 'तार्किक 'कलानुभव' आणि 'जीवनव्यवहार' या ऐवजी ' जीवनानुभव' असे शब्दप्रयोग केले आहेत.

- गणिती अनुभव',या बालशाळा शिक्षणक्रमाच्या मागे काही तात्त्विक - सैद्धान्तिक भूमिका आहे: बालवय, म्हणजे सहा - सात वर्षांपर्यंतचे वय. हे बालकाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वोत्तम असे वय असते. या वयातील शिक्षणाचे बरे -वाईट परिणाम पुढे आयुष्यभर टिकतात. अलीकडच्या मज्जाशास्त्रीय संशोधनातून असे आढळून आले आहे, की बालकांचे आठ-नऊ वर्षांपर्यंतचे वय हे, मेंदूमधील मज्जापेशींची परस्परबांधणी होण्याचे तसेच ही बांधणी, व्यक्तीच्या आयुष्यातील कार्यक्षमतेच्या दृष्टीने पक्की होण्याचे वय आहे. याचबरोबर हे बालवय बालकांना, भावीकालातील एक नागरिक म्हणून घडविण्याचे आणि त्यांच्या सामाजिकीकरणाच्या सुरुवातीचे वय आहे. त्यामुळे या वयातील शिक्षणाचा नव्याने विचार करताना, त्यासाठीचा शिक्षणक्रम हा बालकांच्या मेंदूबांधणीला पूरक असावा, असा विचार करावा लागतो. त्याच वेळी, तो मेंदू विरोधी असू नये, याचीही काळजी घ्यावी लागते.

मज्जा - मानसशास्त्रातील ज्ञानाचा आशय घेऊन शिक्षणक्रम आखायचा असे ठरवले, तर एक विशिष्ट दिशा प्राप्त होते. मेंदूबांधणसाठी आणि त्याच्या पक्केपणासाठी या वयातील बालकांना, कृतिशील अनुभवांची, शारीरिक हालचालींची, भाषिक सरावाची आणि कलानंदाची आवश्यकता असते. त्यामुळे या सा-यांचा समावेश असलेला आणि त्यांमधील कृतियुक्त उपक्रम सुचविणारा असा शिक्षणक्रम असायला हवा. थोडक्यात असे म्हणता येईल, की या वयातील गरजा भागविणारा असा असावा.

मुलांना द्यावयाच्या शैक्षणिक अनुभवांचे क्षेत्र खूप व्यापक आहे. सारे सामाजिक पर्यावरण आणि विश्वातील नैसर्गिक वातावरण त्यांच्या स्वागतासाठी तयार असते. शिक्षकांनी आणि संस्थाचालकांनी जागरूकतेने या अनुभविश्वाचा वेध घ्यायला हवा. त्याकरिता जवळपासच्या अनुभवांसाठी मुलांना शाळेच्या भिंतीबाहेर घेऊन जावे आणि दूरवरच्या अनुभवांना प्रतिकरूप शाळांमध्ये आणून ठेवावे. बालशाळेत, मुलांना अनुभव घेऊ द्यायचे असतात, ते शिकवायचे नसतात, याचे भान नवशिक्षकांना ठेवायला हवे. मुलांना विविधांगी अनुभवांच्या संधी उपलब्ध करून देणे, हे आपले काम असते, मुलांना अनुभव घ्यायला प्रवृत्त करणे, हे आपले काम असते, प्रत्यक्षात अनुभव घेणे आणि त्याकरवी आपले स्वयंशिक्षण साधणे, ही व्यक्तिगत पातळीवर घडून येणारी मानसिक प्रक्रिया असते.

अनुभव घेणे हाच जर का सर्वस्वी बालशिक्षणाचा आशय असेल, तर 'अनुभवांच्या संधी पुरवते ती बालशाळा' अशी बालशाळेची व्यावहारिक व्याख्या आपण करू शकू. बालशाळेत मुले आपल्या आवडीने नि कलाने अनुभवग्रहण करतील आणि त्यांकरवी आपले स्वतःचे शिक्षण करीत जातील. परंतु येथे अनुभवाची

शास्त्रशुद्ध मांडणी करून देणाऱ्या प्रौढाचा किंवा आपल्या रूढ भाषेत शिक्षिकेचा वा पालकांचा कार्यभाग महत्त्वाचा आहे. बालकांच्या विकासाच्या बाबतीत, विशेषतः संवेदनशील अशा लहान वयात, अनुभव उपलब्ध करून देण्याच्या बाबतीत प्रौढांनी 'अष्टावधानी' होण्याची गरज आहे. अनुभवांच्या बाबतीत खालील आठ अवधाने राखायला हवीतः ती अशी असावीत .

- हे अनुभव दैनंदिन जीवनाशी संबंधित असावेत.
- अनुभव परिसरातील ओळखीच्या विश्वाकडून अनोळखी विश्वाकडे नेणारे असावेत.
- अनुभव आव्हानात्मक असावेत.
- अनुभव कृतिशील असावेत.
- अनुभव व्यामिश्र असावेत.
- अनुभव सर्व प्रकारच्या बुद्धिमत्तांना सजग करणारे असावेत.
- अनुभव मेंदूअभिमुख असावेत.
- अनुभव आपले आपण घेता येतील, असे असावेत.

मेंदूआधारित शिक्षणाचा एक नियम असा आहे, की सारे शिक्षण तणावरहित असावे. कोणत्याही प्रकारच्या ताणांमुळे मुले बौद्धिक पातळीवर काम न करता भावनिक पातळीवर घसरतात, आणि मग ती शिकण्याचा आनंद घेऊ शकत नाहीत, की ती शिकण्याच्या कामावर लक्ष केंद्रित करू शकत नाहीत. शिकण्यासाठी उद्युक्त झालेल्या बालकाची भावनिक स्थिती स्थिरतेची असायला हवी. शाळेत येताक्षणीच प्रत्येक मुला - मुलीचा अंदाज शिक्षिकेला घेता आला पाहिजे. आवश्यक असेल त्या मुलांना क्षणभराचा भावनिक आधारही मिळायला हवा. अशाप्रकारे बालकांची भावनिक स्थिरता होणे आणि मुले प्रसन्न मनःस्थितीत असणे, या मेंदूअनुकूल शिक्षणाच्या पूर्वअटमानता येतील.

मुले ज्या वातावरणात वेळ घालवतात त्या वातावरणाचा त्यांच्यावर चांगलाच प्रभाव पडत असतो.त्यामुळे बालशाळेतील वातावरण प्रसन्न असेल तर मुले प्रसन्न होतील, आणि प्रसन्न असतील तर उत्साहाने शिकतील, हे गृहीत धरून शाळा सजली पाहिजे. इमारत - रंग, बाग - बगिचा, फुला - वस्तूंचे - रांगोळीचे सुशोभन, विविध विद्यार्थीकृत गोष्टींनी सजवलेल्या भिंती -छत,स्वच्छता - सौंदर्य यांचे अस्तित्त्व, प्रेमळ शिक्षक-शिक्षिका, बाके नसलेले वर्ग, भरपूर मोकळी जागा, हालचालींना - बडबडीला मुक्त वाव, खेळण्याची -शिकण्याची भरपूर साधने, त्यांतून निवड करण्याचे स्वातंत्र्य या अणि अशा इतर अनेक बाबी प्रसन्न वातावरण घडवून आणतात. प्रसन्नता निर्मितीत विनोदाचेही अनिवार्य असे स्थान आहे. विनोद सर्वानाच आवडतो नि प्रसन्न करतो . भाषेचे आकलन आणि अभिव्यक्ती या दोन्हीही कला अवगत झाल्या, की विनोदाकडे वळणे फारसे कठीण नसते. बालशाळांमधून मुलांना न पेलणारे नि उगीचच वातावरण गंभीर करणारे तथाकथित सुविचार लावण्यापेक्षा भरपूर हसवणारे चित्रांकित विनोद भिंतीवर लावावे. मुलांना त्यांचा मनसोक्त आस्वाद घेऊ द्यावा. भरपूर हसू द्यावे.

बालशाळा व मुलांचे घर यांमध्ये वागण्याचे, वातावरणाचे, प्रसन्नतेचे आणि मुक्ततेचे साध्य असले पाहिजे; सुसंगती असली पाहिजे. विनोबांनी म्हटले आहे."घर शाळेत शिरले पाहिजे आणि शाळा घरात घुसली पाहिजे". हे विधान बालशाळेतील संदर्भात अधिक आशययुक्त बनवता येईल. शाळेतील शास्त्रीय शिक्षणाला पूरक ठरेल अशा रीतीने घराला घडवणे हेही शिक्षणकर्त्यांचेच कार्य आहे. घरानेही, म्हणजेच कुटुंबानेही मुलांबरोबर शिकत जाण्याची उमेद नि तयारी दर्शविली पाहिजे. शिक्षिकांच्या सातत्याने होणाऱ्या गृहभेटी आणि पालकांच्या शाळावर्ग भेटी ही बालशिक्षणाचा एक अविभाज्य उपक्रम आहे. बालशाळेत येण्यापूर्वी आणि आल्यानंतरही बराच काळ, स्वतःचे घर हेच मुलांचे बालविश्व नि भावविश्व असते. त्यामुळे, त्यांना एकदम परके वाटू नये म्हणून, तसेच घरातल्या परिचित वातावरणात असल्यासारखेच वाटावे म्हणून, घर, घरातील माणसे, घरातील वस्तू, विषयी या साऱ्यातून मुलांना हसते - बोलते करावे. बालवयातील मूल हे निसर्गतःच विलक्षण आत्मकेंद्री असते. मात्र, ती शिक्षणातील अडचण न मानता, बालकाच्या स्वतःच्या वस्तू, त्याचे घर, त्याचे जवळचे नातेवाईक आणि या साऱ्यांशी असलेली त्याची जवळीक, या गोष्टी एक शैक्षणिक साधन म्हणून उपयोगात आणता येतात. आपल्या 'घरगुती' गोष्टींचा इथे सन्मान केला जातो. अशी भावना बालकांच्यात निर्माण व्हावी लागते. या साऱ्या अर्थाने मुलांचे घर शाळेत शिरले पाहिजे. याचप्रमाणे, शाळाही बालकांच्या मनांत आणि मनांकरवी त्यांच्या घरांमध्ये घुसली पाहिजे. बालकाची शाळा ही खास त्याची आणि त्याचीच म्हणून घरात एक सन्मानित बाब गणली गेली पाहिजे. शाळेत घडत असलेल्या गोष्टींचे वर्णन बालकांकडून आस्थेने ऐकून घेतले पाहिजे, त्याचे कौतुक केले पाहिजे. बालकाने शाळेमध्ये आत्मसात केलेल्या सवयींना, माहितीला नि ज्ञानाला घरामध्ये सहजपणे सामावून घेतले पाहिजे. शाळा म्हटली की अभ्यास, गृहपाठ अशी पालकांची समजूत असते . त्यामुळे 'अभ्यास' नामक गोष्टीलाच प्राधान्य देण्याची पालकांची प्रवृत्ती असते. साहजिकच मुलांच्या सर्वोत्तम काळातील सर्वांगीण विकासाबाबत घडायला हव्यात अशा अनेक बाबींना पालकांच्या मनांतून फारसे स्थान नसते; असेलच तर ते दुय्यम -तिय्यम असते. बालशाळांतील मुलांच्या पालकांचे प्रबोधन हा, यासाठीच, बालशाळांमधील उपक्रमांपैकीच एक उपक्रम मानला गेला पाहिजे. अर्थातच यासाठी तथाकथित पालकसभा पुरेशा पडणार नाहीत. पालकवर्गच घेतले गेले पाहिजेत. बालशाळा चालविणाऱ्या संस्थांनी अल्पकालीन अशा पालकशाळाही चालविल्या पाहिजेत.

बालक समजावून घेणे, बालविकासाचे शास्त्र माहीत करवून घेऊन अवलंबणे, बालकांसाठी मेंदूआधारित अशा विविधांगी वातावरणात, मुक्तपणा ठेवून आपले आपण शिकू देणे, आणि या शास्त्रीय शिक्षणात पालकांना समाविष्ट करवून घेणे, या साऱ्या गोष्टींना एकत्रितरित्या बालशिक्षण असे म्हणता येईल.

❖